Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277-5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA


## GST (Goods and Services Tax)
EXPLAINED

Valume-VI, Issue-IV
Marathi Part - I
October - December - 2017

IMPACT FACTOR / INDEXING
2016 - 4.205
www.sjifactor.com

Govt. College of Arts & Science
Aurangabad

AJANTA
PRAKASHAN




PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# मराठी अनुक्रमाणिका भाग - १



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | वस्तू आणि सेवा कर : एक दृष्टिकोन<br>**जी. एस. मेश्राम** | ५३-५५ |
| १५ | उएऊ आणि सामान्य व्यक्ती<br>**प्रा. होदलूरकर एन. व्ही.** | ५६-६० |
| १६ | उएऊ करप्रणाली सामान्य जनता आणि सुरक्षा<br>**इंदिरा रजेसिंग गिरासे**<br>**प्रा. डॉ. के. बी. कदम** | ६१-६३ |
| १७ | भारतीय अर्थव्यवस्थेवर जी. एस. टी. चा प्रभाव<br>**डॉ. जयमाला एल. रामटेके** | ६४-६७ |
| १८ | उएऊ सुधारणा फायदे आणि तोटे<br>**डॉ. काशीद एस. व्ही.** | ६८-७१ |
| १९ | जी.एस.टी. चा सामान्य माणसावरील परिणाम<br>**डॉ. लाजवंती टेंभुर्णी (रामटेक)** | ७२-७५ |
| २० | वस्तू व सेवा कर प्रणाली आणि त्याचा ग्राहकावर परिणाम<br>**डॉ. महावीर एन. सदावर्ते** | ७६-८० |
| २१ | वस्तू व सेवा कराचा भारताच्या आर्थिक वृध्दिवर परिणाम<br>**श्रीमती. प्रा. डॉ. जाधव मिनाक्षी भास्कर** | ८१-८३ |
| २२ | जीएसटी आणि सामान्य लोक<br>**डॉ.संजय गव्हाणे**<br>**श्री.नागनाथ शशिकांत कबाडे** | ८४-८८ |
| २३ | भारतीय आर्थिक विकास आणि जीएसटी : एक चिकीत्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. नामदेव सानप** | ८९-९२ |
| २४ | सर्वसामान्य व्यक्तिवर जी.एस.टी.चा प्रभाव<br>**डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे** | ९३-९७ |
| २५ | वस्तू व सेवा कर आणि राज्यसरकार<br>**प्रा. प्रशांत नामदेव इंगोले** | ९८-१०१ |
| २६ | जीएसटी आणि सामान्य लोक<br>**प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर** | १०२-१०५ |





Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

AJANTA - ISSN - 2277-5730 - IMPACT FACTOR - 4.205 (www.sjifactor.com) मराठी भाग - १

२४

# सर्वसामान्य व्यक्तिवर जी.एस.टी.चा प्रभाव

डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

## पार्श्वभूमी

भारतात अप्रत्यक्ष कर कायद्यानुसार साधारणतः ८३,५०,४९१ एवढे करदाते आहेत. यापैकी ८०३, २६१ ऐवढे करदाते महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्राची लोकसंख्या २० कोटींपेक्षा जास्त असून, करदाते जास्त, गौरवास्पद बाब आहे.

भारतातील १० टक्के लोक महाराष्ट्रात, १० टक्के करदाते. ७,००५२०५ करदाते जुन्या कायद्यानुसार जी.एस.टी. मध्ये परिवर्तीत झाले म्हणजे ८७.८० टक्के करदाते नवीन कायद्यनुसार झाले करदरांचे १० टक्के, २० टक्के, ३० टक्के एवेजी तीन गटात सुसूत्रीकरण झाले. १ जूलै २०१७ ला एक राष्ट्र-एक कर, एक कर दर त्याची आदर्श मूल्य साखळी.

कच्च्या मालाचे पुरवठादार - उत्पादक - घाऊक विक्रेते किरकोळ विक्रेते ग्राहक

जी.एस.टी. हा कर नसून एक करप्रणाली आहे, कर लावण्याचे तत्व आहे. आपण विक्री कराला वॅट म्हणतो पण तो वॅट कर प्रणाली वर आधारीत एक कर आहे. आधीच्या कर व्यवस्थेत दोनच कर मूल्यवर्धित होते. आता संपूर्ण जी.एस.टी. मूल्यवर्धित आहे. मूळात मूल्यवर्धित करप्रणालीचा कायदा संपूर्ण मूल्यवर्धित कर साखळीमध्ये फक्त मूल्यवर्धनावर कर लागतो, त्यामुळे करावर कर लागत नाही. त्यामुळे दुहेरीकर आकारणे टळते. ग्राहकांचा कायदा म्हणजे २५ ते ३० टक्के कर बोजा कमी होतो, वस्तू स्वस्त होतात. वस्तूवर कमी करदर हे जी.एस.टी. चे सूत्र आहे. संपूर्ण देशात १ जूलै पासून कायद्या लागू असून केंद्रीय करात प्राप्तीकर, नियम, निर्यात आथात, उत्पादन शूल्यक, केंद्रीय विक्रीकर तर राज्य पातळीवर राज्य शासनाच्या आधीन-जमीन महसूल, राजस्व नोंदणी कर भारतात आयातू-निर्यात वस्तूंच्या पुरवठयाचे कलम-११, सेवेचा पुरवठा करणा-या व्यक्तिचे भारतातील ठिकाण कलम-१२.

## जी.एस.टी. ची वैशिष्टये

संपूर्ण राष्ट्र एक जीनसी, समावेशक ता, उत्पादनावर नव्हे तर पुरवठयावर कर, बहुस्तर (तीनस्तर) प्रथम ५ वर्षात कर उत्पन्नात घट झाल्यास राज्यांना पर्याप्त नुकसान भरपाई आयात घटकावरील कर व जाती मूल्या धारित कर, टीसीएस पध्दत म्हणजे मूळातच कर कपात. ही कर रचना उत्यंत विचारपूर्वक, व्यावहारीक, पुरोगामी, लवचीक उत्पादक ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला. शून्य कर दर, करमणूक वस्तू सेवा ५ टक्के, गुणात्मक वस्तू व सेवा प्रमाण दर १२.१८ टक्के, चैनीच्या वस्तू व सेवा २८ टक्के व अपवाहात्मक परिस्थितीमध्ये कमाल दर ४० टक्के अशी व्यवस्था आहे. पॅकींग न केलेल्या वस्तू, शिक्षण आरोग्य ही क्षेत्र कमी दर व करमुक्त ठेवण्याचा प्रयत्न मालमत्ता कर, व्यवसाय कर, वीज कर, वाहन कर, इंधन करमणूक कर, विक्री कर, अबकारी कर इत्यादी. तर स्थानिक स्वराज्य संस्थांचे वेगळी अशा करातून भ्रष्टाचार, गैरकारभार होत असे त्यातून सूटका म्हणजे एक राष्ट्र एक कर प्रणाली परिणामकारक आहे. जी ग्राहक, उत्पादन, सरकार यांना न्याय देणारी आहे. जी.एस.टी. केंद्रीय वस्तू व सेवाकर, राज्य वस्तू व सेवा कर एस.जी.एस.टी, एस.जी.एस.टी., आंतरराज्य वस्तू व सेवा कर आय. जी.एस.टी. तीनच अप्रत्यक्ष कर असणार. वस्तू व सेवा कर एकाच वेळी एकाच पध्दतीने एकाच कर दर व्यवस्थे ने लागू केले. संविधानातील १२२ वी दुरुस्ती केली गेली.

केंद्रीय वस्तू व सेवा कर कायद्यामध्ये एंकदर २१ प्रकरणे १७४ कलमे, ३ परिशिष्ट आहेत. या मध्ये कर आकारणी व कर संकलन कलम - ५, आंतरराजय पुरवठा कलम -७ राज्यांतर्गत पुरवठा कलम -८, समुद्र किना-याच्या हदीत केलेला पुरवठा कलम-९, वस्तू सेवेच्या



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

किंवा दोन्ही पुरवठयाचे ठिकाण कलम -१०,

**वस्तू व सेवा करप्रणालीची वैशिष्टये**

- या कर प्रणालीमुळे वसतू स्वस्त होतील.
- केंद्र आणि राज्य शासनाचे बहुतांश प्रत्येक्ष कर या करप्रणालीत विलीन झाल्याने कर प्रणाली सोपी होईल.
- व्यापरी व उद्योगधंधास हिशेव ठेवणे सोपे जाईल.
- संपूर्ण देशात एकच कर प्रणाली अमलात आल्याने संपूर्ण देश एकसंघ बाजारपेठ होईल.
- कररचना पारदर्शक असेल संगणकीय सुविधांमुळे व्यापा-यांना सुविधा होईल.
- वसतू आणि सेवा करप्रणालीत केंद्र आणि राज्याचे एकूण १७ कर विलीन होतील. त्यात केंद्रीय उत्पादन शुल्क, अतिरिक्त उत्पादन शूल्क, अतिरिक्त सीमा शुल्क, विशेष अतिरिक्त सीमा शूल्क, सेवाकर, वस्तू आणि सेवांच्या पुरवठयाशी संबंधित असलेला केंद्रीय अधिकार आणि उपकर हे केंद्रीय कर असणार.
- राज्याचा मूल्यवर्धित कर, केंद्रीय विक्रीकर, ऐष आराम कर प्रवेश कर, (ऑक्टायें एलबीटी, वाहनांवरील प्रवेश कर, वस्तूवरील प्रवेश कर, करमणूक आणि मनोरंजन कर, जाहिरातीवरील कर, खरेदीकर, वन विकास कर, लॉटरी, बेटींग, जुंगारावरील कर, वस्तू आणि सेवा च्या पुरवण्याशी संबंधित कर यांचा समावेश असेल).

**जी.एस.टी.चा फायदा**

- भारतीय अर्थव्यवस्था व निर्देशांनावर उत्तम परिणाम होईल.
- या कर प्रणाली मुळे राज्यात प्रामाणिक व्यापाराला चालना मिळेल.
- कर चुकवे गिरीला आळा बसेल.
- जी.एस.टी. करप्रणाली अंतर्गत २० लाखापर्यंतची उलाढाल करमुक्त ठेवण्यात आली आहे.
- या कर प्रमाणाली जुन्या थकबाकीदारांचे करदायित्व संपुष्टात येणार नाही.
- जी.एस.टी. नंतर राज्याची महसूल हामी केंद्रशासन ५ वर्षात नुकसान भरपाई स्वरुपात भरुन देणार आहे.
- राज्याच्या उत्पन्नात नक्कीच वाढ होईल.
- प्रवेश करांचे निर्मूलन, आधी राजयांच्या / शहरांच्या सीमेवर प्रवेश कर लागत असे त्यामुळे वाहनांच्या रांगाच रांगा लागत असे. त्यामुळे दळणवळण मंदांवर असे तसेच इंधनाचा अपव्ययही मोठा होता. मुख्यत आपला एक देश एक बाजारपेठ या तत्वामध्यी मोठा अडयळा होता.
- **देशातंर्गत आर्थिक असमतोल दूर करणार**

आधीचे अप्रत्यक्ष कर व्यापाराचा उगम होण-य राज्याचा फायदा करत. जी.एस.टी. मुळे वस्तूंचा उपभोग घेणाऱ्या Destination based राज्यांचा फायदा होईल. आधी मोजकी उत्पादक राज्य. आणि इतर राज्यात आर्थिक दरी वाढतच जायची. आता करात झालेल्या वाढीमुळे इतर राज्ये सामाजिक, आर्थिक प्रश्नावर खर्च करुन सुधारण यासाठी प्रयत्न करतील.

- सरकारने सगळयाचा जी.एस.टी. क्रमांक त्यांच्या पॅन क्रमांकाशी जोडला त्यामुडे उत्पादक, व्यापरी विक्रेते यांच्या व्यवहार व उत्पन्न यातील तफावत कळून येईल. उत्पन्नात पारदर्शकता उत्पन्नात परदर्शकत येईल. उत्पन्न करातील Income tax, Corporat tax करबुडवेगिरी टळेल.
- जी.एस.टी. सहकारी संघराज्ये Co-Operative Federalism संकल्पनेचे उत्तम उदाहरण आहे.





**जी.एस.टी. आणि दुकानदार**

- रिटनेसाठी १० ते २० दिवसाचा कालावधी.
- कोणते ही बदल २ महिन्याचा कालावधी.
- प्रत्येक राज्यात जी.एस.टी. दर एकसारख्या राहणार.
- दुस-या राज्यात खरेदी विक्रीसाठी अर्जाची आवश्यकता नाही.
- दुस-या राज्यात माल पाठविण्यासाठी कर भरावा लागेल.

**जी.एस.टी. आणि उत्पादक**

- २० लाख रुपयांची मर्यादा.
- करांवर कर लागणार नाही, व्यवहार मूल्यावर कर
- प्रवेशकर आय. जी.एस.टी. लागू व त्यांचे क्रेडिट मिळेल.
- कोणतही उपकर लागणार नाही. इनपूट सर्विसवर आय.जी.एस.टी. आणि एस.जी.एस.टी. पूर्ण क्रेडिट मिळेल.
- जी.एस.टी. मधील परतावा (Input Credit System ) उत्पादक, व्यापरी, विक्रेता यांना कराचा परतावा मिळेल जी.एस.टी. एक अप्रत्येक्ष कर आहे, त्यामुळे करांचा बोजा ग्राहकांवर आहे. Input Credit करांना साखळीपूर्ण होणे अवश्यक आहे. त्यामुळे सरकारच्या कर संकलनात वाढ होईल, प्रत्यक्षकरात वाढ होईल. उत्पन्नात पारदर्शकता येईल.
- उत्पन्न करातील घ्मद्स Tax, Corporate Tax कर बुडवेगिरी टळेल.
- एक देश एक बाजारपेठ तत्वावर अडथळा नसणार.

**जी.एस.टी. आणि सेवादाता**

- छोटया व्यावसायिकांना सवलती.
- ज्या राज्यात व्यावसायिक शाखा आहे. तेथे रिटर्न नोंदणी बंधनकारक.
- प्रत्येक नोंदणी साठी वर्षाला ३७ रिटर्न भरणे अनिवार्य आहे.
- कोणतेही उपकर लागू होणार नाही.
- करदात्यांनी नोंदणी केल्यास दुकानदार, उत्पादक व सेवा देणा-यांना खालील फायदा होतो.

**कंपोझिशन योजना व्यापाऱ्यांसाठी**

- ३० दिवसांच्या आत एङ्ग् ०१ अर्जभरुन या योजनेचा फायदा घेता येतो.
- व्यापा-यांची वार्षिक उलाढाल ७५ लाख रुपयापेक्षा कमी असल्यास जी.एस.टी. सवलत प्राप्त करण्यासाठी ही योजना आहे.
- वार्षिक उलाढालीवर एकदाच कर देऊन व्यापारी ०१ टक्के, उत्पादक ०२ टक्के, सेवा दाता ०५ टक्के करदायीही तनाव, रिटंन अकाउंटच्या कटकटीतून सुटका.
- ७५ लाखांच्या मर्यादेपर्यंत करमुक्त, करमुक्त विक्री आणि एकच पॅन क्रमांकावर नोंदणी.
- दारु, इंधन विक्रीकरीता ही योजना लागू नाही.
- नोंदणीकृत वितरकाकडून माल खरेदी केल्यास कर दयावा लागेल.
- Input Credit परत मिळत नाही.
- ग्राहक कर लाऊ शकत नाही, कापु शकत नाही.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

- राज्याच्या बाहेर माल खरेदी करु शकतात मात्र विकु शकत नाही.
- तिमाही रिटर्न भरणे अनिवार्य आहे.
- ७५ लाख मर्यादा झाल्यावर मुळ जी.एस.टी. डिलर मध्ये जाणार.
- करमुक्त वस्तूच्या विक्री असेल, विक्री वस्तू किंमतीवर कर दयांवा लागणार आहे.

**जी.एस.टी.कायद्ययातील महत्वाच्या तरतूदी**

- आंतराज्य व्यावहारांवर आय जी.एस.टी. आकारला जाईल तर राज्या आंतर्गत व्याव्हारावर सी. जी.एस.टी. व एस. जी.एस.टी. आकारला जाईल. त्याच प्रमाणे संयुक्त राष्ट्रातील व्यवहारावर युटी जी.एस.टी. आकारला जाईल.
- जी.एस.टी. मध्ये पेट्रोलची उत्पादने जसे पेट्रोलयम क्रुड, मोटर सपिरिट, नैसर्गिक वायु हे तात्पुरते जी.एस.टी. च्या बाहेर ठेवले आहे.
- जर अनोंदणीक्रुत व्यक्तीकळुन वस्तु किंवा सेवा खरेदी केल्यातर रिव्हर्स चार्जच्या तरतुदींव्दारे जी.एस.टी. भरावा लागेल.
- रिव्हर्स चार्जच्या तरतुदीमध्ये जर एका दिवसामध्ये रु.५००० पेक्षा कमी असेल तर त्यावर आर सी. एम मध्ये कर भरण्याची आवश्यकता नाही.
- जी.एस.टी. मध्ये मासीक वितरण भरले जाईल.
- जी.एस.टी. हा पुरवठयावर आधारीत आहे. पुरवठा झाला की जी.एस.टी. लागेल.
- लाहान व्यापारी ज्यांची मागील वर्षीची उलाधाल ७५ लाखाच्या आत असेल तर तो संयुक्त कर पध्दतीला लावू शकतो.
- कच्चा माल, Input सेवा आणि भांडवली वस्तू यावर भरलेल्या कराचे नोंदणीकृत कर पात्र व्यक्तीला आय.टी.सी. मिळेल.
- जी.एस.टी. मध्ये अन्न व पेय अचल संपती, प्रवासी वाहन, आऊट डोर केटरिंग सौंदर्य उपचार, आरोग्य सेवा, सौंदर्य प्रसाधने आणि प्लॉस्टिक सर्जरी, क्लब, आरोग्य केंद्राची सदस्य शुल्क, प्रवासी वाहने, जीवन विमा, आरोग्य विमा, वैंयक्तीक वापराच्या वस्तू, कॉंट्रक्ट सेवा यावरचा आयटीसी मिळत नाही.
- जी.एस.टी. मध्ये वस्तूंसाठी एचएसएन कोड तर सेवाकरीता एसएसी कोड वापरले जातील. या कोडनुसारच वस्तू व सेवांचे कराचे दर ठरवलेले आहेत.
- शेडयुल आणि नोटिफिकेशन नुसारच वस्तू व सेवांवर कराचे दर आकारावे नाही तर त्याचे परिणाम सर्वसामान्यांना भोगावे लागतील.
- वस्तू व सेवांचा पुरवठा केल्यावर पुरवठादारांने प्राप्तकर्त्याला टॅक्स इनव्हाइस देणे आवश्यक आहे.
- टॅक्स इनव्हाइसवर कायाद्ययात दिल्याप्रमाणे संपूर्ण माहिती असायला हवी.
- जर करदात्याची वार्षिक उलाढाल १.५ कोटींपेक्षा कमी असेल तर त्याला बिलाध्ये एचएसएन कोड लिहिण्याची गरज नाही आणि जर त्याची वार्षिक उलाढाल १.५ कोटी ते ५ कोटी असेल तर दोन अंकी कोड आणि जर वार्षिक उलाढाल ५ कोटीपेक्ष जास्त असेल तर ४ अंकी एचएसएन कोड बिलामध्ये नमुद करावा लागेल. वस्तू जर निर्यात केले असतील तर त्यांच्या बिलावर आठ अंकी कोड कर आकारावा.
- जर एखादया व्यक्तीची वार्षिक उलाढाल रु. २० लाखाच्या वर असेल तर त्या व्यक्तिला नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे.





संदर्भग्रंथ सुची


- उद्योजक, ऑगस्ट २०१७, संपादक - पी.पी. देशमुख.
- उद्योजक, जूलै २०१७, संपादक - पी.पी. देशमुख.
- चाणक्यमंडल परिवार, ऑगस्ट २०१७, संचालक - अविनाश धर्माधिकारी.
- लोकराज्य जून २०१७ मुख्य संपादक - ब्रिजेश सिंह.
- http://www.cbec.gov.in
- resources//htdocs - cbec/gst/tweet - feg- pdf.
- www.cbec.gov.in


PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad